<u>रे.मु.नं. ११/२०१३.</u>

## <u>नि. ६८ खालील आदेश</u>

सदरचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. अर्जात वादीचे कथन की, दावा हा मालकी वहिवाटीबाबत ठराव होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी आहे, ज्यामध्ये प्रतिवादींनी कैफियत दाखल करुन वादींची मालकी नाकारली नाही. वादीने दाव्यासोबत दावा मिळकतीचे मालकी वहिवाटीबाबत ठराव होवून मिळणेसाठी कच्चा नकाशा दाखल केला आहे. त्या नकाशाप्रमाणे वादीने डिक्लेरेशन मागितले आहे. दाव्यातील प्रतिवादींची कैफियत पाहता वादीस दाव्यामध्ये दुरुस्ती करुन वैकल्पीकरित्या दावा मिळकतीतील अविभक्त मालकी हक्क पृथक करुन कब्जा मागणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी व वादी त्यासाठी लागणारी कोर्ट फी भरण्यास तयार आहे. या दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्याचे हक्कास बाधा येणार नाही, दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही, त्यामुळे अर्ज मंजूर करावा. वादीने त्याचे कथनाचे पुष्टयर्थ नि. ५९ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले.

२. सदर अर्ज प्रतिवादीने नि. ७० वर म्हणणे देवून नाकारला आहे. त्याचे कथन की, वादीचा दावा हक्कपत्रकाच्या नोंदीवरुन हक्क शाबीतीसाठी व वहिवाटीवरुन निरंतर ताकीदीसाठी आहे. दाव्यात वर्णन केलेली मिळकत, दाव्यासोबत दाखल केलेल्या मिळकतीच्या उता–याचे अवलोकन करता दावा मिळकत सरकारी आहे. ती वादी प्रतिवादी तसेच अनेक लोकांना नवीन शर्तीवर मिळाली आहे. त्यामुळे वादीची दावा दुरुस्तीची मागणी कायदेशीर नाही. वादीने या दाव्यात प्रतिवादी विरुध्द लबाडीची विधाने करुन खोटा दावा दाखल करुन तुर्तातुर्त ताकीदीची मागणी केली होती जी न्यायालयाने गुणावगुणावर फेटाळून लावली आहे. तेंव्हा पुन्हा

वादी दुरुस्ती मागत आहेत.  दाव्यात मिळकतीचे वर्णन, दाव्यासोबत दाखल केलेले उतारे यावरुन अनेक हितसंबंधाची नावे वहिवाटदार सदरी असल्याचे आढळून येते. वादीचा दावा केवळ ताकीदीसाठी असताना आता दुरुस्ती करुन वादी कब्जाची मागणी करत आहे.  त्यामुळे दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे. दाव्यात दिलेली कारणे व दुरुस्तीचे कारण वेगळे आहे. अशा प्रकारची दुरुस्ती करता येणार नाही,  दुरुस्ती प्रामाणिकपणाची नाही,  केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी अर्ज दिला आहे, त्यामुळे तो नामंजूर करावा अशी विनंती केली.

३.       अर्ज, वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. वादी वकीलांचे कथन की, दावा हा जाहीर होवून मिळणसोठी व निरंतर ताकीदीसाठी असून प्रतिवादीने वादीची मालकी नाकारली नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये त्याचा हिस्सा त्यांना मिळावा यासाठी वैकल्पीकरित्या मागणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याचा हेतू बदलत नाही. अशा परिस्थितीत अर्ज मंजूर करावा. याउलट प्रतिवादीचा युक्तिवाद की, वादीने नि. ५ चालवितेवेळी दावा मिळकतीत त्याचा कब्जा आहे त्यामुळे हरकत अडथळा करु नये म्हणून मागणी केली होती.  त्यामध्ये कब्जा नसल्याचे सिध्द झाल्याने अर्ज फेटाळणेत आला आहे. आता पुन्हा वादी दुरुस्ती करुन कब्जा मागत आहेत. त्यांच्या दाव्यातील वादकथने व अर्जातील कथनेही परस्पर विरोधी आहेत. दाव्यात त्यांनी कब्जा असल्याचे कथन केले होते व न्यायालयासमोर वादीचा कब्जा नाही असे आलेवर ते दावा दुरुस्ती करु पाहात आहेत व कब्जासाठी मागणी करीत आहेत. अशा स्थितीत दाव्याचे स्वरुपात बदल होणार असल्याने अर्ज नामंजूर करावा.

४.       दाव्याचे अवलोकन करता दावा हा ठरावाचा व निरंतर ताकीदीचा आहे ज्यामध्ये वादींनी दाखल केलेल्या हातनकाशानुसार सदर मिळकतीत त्याची मालकी आहे असे ते जाहीर

करुन मागत आहेत व प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकीदीची मागणी करत आहेत. या अर्जाद्वारे वादीचे कथन की, यदाकदाचित न्यायालय वादीचा दावा मिळकतीत कब्जा नाही या मतापर्यंत आल्यास वैकल्पीकरित्या कब्जाची मागणी करणे गरजचे आहे. त्यामुळे हा अर्ज केला आहे.

५. हे सर्वमान्य आहे की, एकाच मिळकतीशी निगडीत एकाच पक्षकारांमध्ये असणारे वाद एकाच दाव्यामध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याची पुनरावृत्ती टळणार आहे. अशा स्थितीत वादी वैकल्पीकरित्या करत असलेली मागणी या दाव्यात करु शकतील. त्यामुळे दाव्याची पुनरावृत्ती टळणार आहे. नैसर्गिक न्यायाचे तत्वे समोर ठेवून वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे.

६. पण दावा चौकशीस आहे. अशा स्थितीत वादींनी दावा दाखल तारखेपासून आजतागायत सदर प्रकारची दुरुस्ती का केली नाही याचे कारण दिले नाही. त्यामुळे या कारणासाठी वादी खर्चास पात्र असतील. कारणे मी खालील आदेश देत आहे –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रु.३००/– सह मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची रककम भरुन वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करावी.

(श्रीमती एस.बी.यादव)

दिनांक २४.०२.२०१६. ६वे सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर पंढरपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment

a)Name of the Stenographer : A.A.Chavan.

b) Court : 6th Jt. Civil Court, Pandhapur.

c) Judgment/Order signed by PO on : 24.02.2016

d) Judgment/Order uploaded on : 24.02.2016